21 JUL 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा. सोबत प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. शिंम्पा शर्मा यांच्यासह मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठाचा 'डी. वाय.' सोबत करार

## शैक्षणिक, आरोग्य संशोधन आणि सेवांविषयक होणार करार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यात शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रांतील संशोधन आणि सेवा यांचे आदानप्रदान करण्याच्या अनुषंगाने एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

पाच वर्षांपूर्वी आरोग्य सेवांचे आदानप्रदानविषयक सामंजस्य कराराची यशस्विता पाहून आता त्याची व्याप्ती वाढवित डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत पुढील पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. आज या करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्था या दोहोंची शैक्षणिक व संशोधकीय प्रगती एकसारख्या गतीने सुरू आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या सामंजस्य कराराची व्याप्ती आता व्यक्तींकडून संस्थांकडे सरकली आहे. शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटपासून ते सामाजिक कार्यापर्यंत असे अनेक अभ्यासक्रम आहेत, जे वैद्यकीय क्षेत्राला पूरक आणि उपयुक्त आहेत.

यावेळी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी मागील पाच वर्षांतील सामंजस्य कराराच्या फलश्रुतीविषयी सविस्तर माहिती दिली. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी स्वाक्षरी केल्या. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक डॉ. शिंम्पा शर्मा, संशोधन संचालक डॉ. सी.डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. राजेश कल्लाप्पा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव डॉ. संजय जाधव, विश्वजीत खोत, विनोद पंडित आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
21 JUL 2025

वामाक्षी
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठाचा डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत महत्त्वपूर्ण करार

## शैक्षणिक व आरोग्य संशोधन आणि सेवांविषयक आदानप्रदान होणार



कोल्हापूर, : (महान्यूज अँड व्ह्यूज ):

शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यादरम्यान आज शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रांतील संशोधन आणि सेवा यांचे आदानप्रदान करण्याच्या अनुषंगाने एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील रिसर्च सेंटर व हॉस्पिटल यांच्या दरम्यान पाच वर्षांपूर्वी आरोग्य सेवांचे आदानप्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला होता. या कराराची यशस्विता पाहून आता त्याची व्याप्ती वाढवित डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत पुढील पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. आज या करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्था या दोहोंची शैक्षणिक व संशोधकीय प्रगती एकसारख्या गतीने सुरू आहे. पूर्वीच्या सामंजस्य कराराचा दोन्ही बाजूंना अतिशय चांगला लाभ झाला आहे. कराराची व्याप्ती वाढल्यामुळे येथून पुढील काळात वैद्यकीय सेवांच्या पलिकडे इतरही विविध विभागांमध्ये सहकार्यवृद्धी करता येणे शक्य होईल. विद्यार्थ्यांचे आदानप्रदानही सुलभ होईल. परस्पर सहकार्यातून आपण एकत्रित वृद्धिंगत होऊ, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या सामंजस्य कराराची व्याप्ती आता व्यक्तींकडून संस्थांकडे सरकली आहे. शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटपासून ते सामाजिक कार्यापर्यंत असे अनेक अभ्यासक्रम आहेत, जे वैद्यकीय क्षेत्राला पूरक आणि उपयुक्त आहेत. त्यामधील संशोधकांमध्ये विचारांची आणि संशोधनकार्याची देवाणघेवाण तसेच सहकार्य निर्माण व्हायला हवे. दोन्ही संस्थांतील विविध विषयतज्ज्ञांमध्ये संवाद प्रस्थापित झाला पाहिजे. त्या दृष्टीने दोन्ही संस्थांतील अभ्यासक, संशोधक, तज्ज्ञ यांच्या संयुक्त कार्यशाळांचे आयोजन वेळोवेळी व्हायला हवे. त्याद्वारे विशेषतः सार्वजनिक आरोग्य क्षेत्राच्या अनुषंगाने संयुक्त सहकार्य प्रकल्प साकार व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी मागील पाच वर्षांतील सामंजस्य कराराच्या फलश्रुतीविषयी सविस्तर माहिती दिली. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी स्वाक्षरी केल्या. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक डॉ. शिंपा शर्मा, संशोधन संचालक डॉ. सी.डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. राजेश कल्लाप्पा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव डॉ. संजय जाधव, विश्वजीत खोत, विनोद पंडित आदी उपस्थित होते.

अनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JUL 2025 तरूण भारत

# अभिषेक देवकातेची जागतिक स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ॲथलीट अभिषेक देवकाते याची जर्मनीत होणाऱ्या 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स–२०२५"साठी भारतीय संघात निवड झाली आहे.

नाईट कॉलेज कोल्हापूर येथे शिक्षण घेत असलेला आणि शिवाजी विद्यापीठामध्ये सराव करणारा विद्यार्थी अभिषेक देवकाते याची जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्समधील दहा हजार मीटरच्या शर्यतीसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे.



कोल्हापूर : अभिजीत देवकाते याला शुभेच्छा देताना कुलगुरू डॉ. शिर्के, प्र कुलगुरू पी. एस. पाटील व इतर.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची त्याने भेट घेतली. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव गजानन पळसे, प्रशिक्षक प्रकुल मांगोरे–पाटील, अमोल अळवेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

21 JUL 2025

वामाक्षी
Boutique
Mob.-9175089609

# शिवाजी विद्यापीठाच्या अभिषेक देवकाते याची जर्मनीत होणाऱ्या जागतिक स्पर्धेसाठी निवड



**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

शिवाजी विद्यापीठाचा अॅथलीट अभिषेक देवकाते याची जर्मनीत होणाऱ्या 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५'साठी भारतीय संघात निवड झाली आहे. आज कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी त्याला शुभेच्छा देऊन सुयश चिंतले.

नाईट कॉलेज ऑफ कोल्हापूर येथे शिक्षण घेत असलेला आणि शिवाजी विद्यापीठामध्ये सराव करणारा विद्यार्थी खेळाडू अभिषेक देवकाते याची जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये अॅथलेटिक्समधील दहा हजार मीटरच्या शर्यतीसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. आज त्याने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी कुलगुरूंनी त्याचा सत्कार करून स्पर्धेमध्ये भरीव यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव गजानन पळसे, प्रशिक्षक प्रकुल मांगोरे-पाटील, अमोल अळवेकर उपस्थित होते.

पुढारी

# 'एईडीपी' अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : प्र-कुलगुरू डॉ. पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत 'अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अर्थात 'एईडीपी' अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

पारंपरिक अभ्यासक्रमातून रोजगाराभिमुख व उद्योगास आवश्यक कौशल्य प्राप्त होण्याकरिता राज्य शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'एईडीपी' अभ्यासक्रम योजना पारित केली आहे. त्यापार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यापीठात सद्यस्थिती पाच अभ्यासक्रम एईडीपी अंतर्गत विविध कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. तसेच अन्न तंत्रज्ञान व व्यवस्थापन आदी अभ्यासक्रम सुरू आहे. सर्व अभ्यासक्रम हे उद्योगात आवश्यक अभ्यास संरचना व विद्यार्थ्यास आवश्यक कौशल्यप्राप्तीच्या अनुषंगाने तयार केले आहेत. नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगार मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या, विद्यापीठाच्या व उद्योगाच्या सामाजिक-आर्थिक विकासाकरिता पाठबळ मिळणार आहे.

सकाळ

# 'एईडीपी' अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : डॉ. प्रमोद पाटील

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत 'अप्रेंटिंसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अर्थात 'एईडीपी' अभ्यासक्रम सुरू केला असून, या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

डॉ. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, एकविसाव्या शतकाच्या वेगाने बदलणाऱ्या या कालखंडात पारंपारिक अभ्यासक्रमातून रोजगाराभिमुख आणि उद्योगास आवश्यक कौशल्य प्राप्त होण्याकरीता राज्य शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'एईडीपी' अभ्यासक्रम योजना पारित केली. शिवाजी विद्यापीठ आणि अंतर्गत कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. विद्यापीठात सद्य:स्थिती पाच अभ्यासक्रम एईडीपी अंतर्गत सुरू केले असून, यामध्ये बी.एस्सी, मायक्रोबायोलॉजी, बी.एस्सी.-एम. एस्सी. (ए.आय.-एम.एल.), बी. ए. (फिल्म मेकिंग), बी.ए. (स्पोर्टस), बी.कॉम (बी.एफ.एस.आय.) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयामध्ये बॅचलर ऑफ इंटेरियर डिझाईन, बी.ए. (ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेटर), बी.एस्सी. (रसायनशास्त्र), बी.एस्सी. (भौतिकशास्त्र), बी.एस्सी. (संगणकशास्त्र) तसेच अन्न तंत्रज्ञान व व्यवस्थापन इत्यादी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरीत विद्यापीठाशी किंवा नजीकच्या संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

तरूण भारत

# 'एईडीपी अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत 'अप्रेंटिंसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अर्थात 'एईडीपी' अभ्यासक्रम सुरू करण्यात आले

■ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

असून या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे. डॉ. पाटील म्हणाले, पारंपारिक अभ्यासक्रमातून रोजगाराभिमुख व उद्योगास आवश्यक कौशल्य प्राप्त होण्याकरीता राज्य शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'एईडीपी' अभ्यासक्रम योजना पारित केली आहे. शिवाजी विद्यापीठ व अंतर्गत कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. विद्यापीठात सद्यस्थिती पाच अभ्यासक्रम एईडीपी अंतर्गत सुरू करण्यात आले आहेत. या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगार मिळणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

21 JUL 2025




# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण आजची गरज : डॉ. विलास शिंदे



कोल्हापूर, : (महान्यूज अँड व्ह्यूज ):

सद्यस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८७ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या वेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभागाचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे, सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, आय.टी. प्रतिनिधी अमोल आडगुळे, सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते.

डॉ.शिंदे म्हणाले, आज विद्यार्थी संख्या घटण्याचे प्रमाण वाढत आहे. अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि स्वायत महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढत आहे. वारेमाप पैसा गुंतवून कोणतेही शिक्षण घेता येते, याचे हे द्योतक आहे. पारंपरिक महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमातील बदलांमध्ये होणारा विलंब हेही कारण विद्यार्थी संख्या कमी होण्यामागे आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हे घटक महत्त्वाचे आहेत. याद्वारे गरजू आणि वंचित यांना शैक्षणिक सेवा प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य होते. विद्यार्थ्यांना प्रोफेशनल पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या निश्चितपणे वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभिजीत रेडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढीचा दर वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्यावर आधारित आणि रोजगारभिमुख शिक्षण दिले पाहिजे.

कार्यशाळेत आशिष घाटे, डॉ. मुफिद मुजावर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ.नितीन रणदिवे, डॉ.सचिन भोसले, डॉ.सुशांत माने, डॉ.प्रवीण लोंढे, बबन पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ४६ अभ्यास केंद्रांतील ६६ समन्वयक आणि लेखनिक यांनी सहभाग घेतला.

यावेळी इंग्लंडमधील बाथ विद्यापीठामध्ये बी.एस्सी. (फायनान्स) पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.ए. (अर्थशास्त्र) प्रथम वर्षात प्रवेश घेतल्याबद्दल कु. दिया आवाडे यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वयं अध्ययन साहित्य देण्यात आले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर स्वागत केले. संचालक डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव शिंदे यांनी आभार मानले.

21 JUL 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण आजची गरज

■ कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सद्यस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज आहे, प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८७ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थी संख्या घटण्याचे प्रमाण वाढत आहे. अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि स्वायत महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढत आहे. शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या वाढेल. अभिजीत रेडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल स्वीकारले पाहिजेत.

आशिष घाटे, डॉ. मुफिद मुजावर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. सचिन भोसले, डॉ. सुशांत माने, डॉ. प्रवीण लोंढे, बबन पाटोळे यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली. डॉ. चांगदेव बंडगर यांनी स्वागत केले. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, आय. टी. प्रतिनिधी अमोल आडगुळे, सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर कुंभार, कापसे यांची निवड

## व्यवस्थापन परिषदेचे सदस्य पृथ्वीराज पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



ॲड. अभिजित कापसे



पृथ्वीराज संजय पाटील

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठ अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे यांची निवड करण्यात आली. नऊ जणांची विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवर निवड झाली.



डॉ. आर. आर. कुंभार

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक झाली होती. बैठकीत 'सिनेट'वर दोघे व अन्य अधिकार मंडळावर १३ जणांच्या समावेशचा निर्णय झाला होता.

दरम्यान, नियुक्त सदस्यांना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे याच्या स्वाक्षरीने पत्रे देण्यात आली. प्राचार्य प्रतिनिधी गटातून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुंभार व संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज संजय पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली.

इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. डॉ. भानारकर यांची निवड झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयोलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), यांची निवड करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JUL 2025

सकाळ

# विद्यापीठाच्या अधिकारमंडळांवर अकरा जणांची निवड

## डॉ. आर. आर. कुंभार, अभिजित कापसे, पृथ्वीराज पाटील यांचा समावेश

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट (अधिसभा), स्थायी समिती, अभ्यास मंडळ या अधिकार मंडळांवर अकरा जणांची निवड झाली आहे. त्यात विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे, व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील आदींचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक नऊ जुलै रोजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात अधिसभेवर दोन आणि इतर अधिकार मंडळावर तेरा जणांची निवड करण्याचा निर्णय झाला. यावेळी स्थायी समितीचे सदस्य कुलसचिव व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता एम. एस. देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य सर्जेराव पाटील, ॲड. अजित पाटील, प्रा. डॉ. रघुनाथ पाटील उपस्थित होते.



या बैठकीतील निर्णयानुसार प्राचार्य प्रतिनिधी गटातून प्राचार्य डॉ. कुंभार आणि संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची अधिसभा सदस्यपदी निवड झाली.



डॉ. आर. आर. कुंभार



ॲड. अभिजीत कापसे



पृथ्वीराज पाटील

व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) आणि इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. एम. के. भानारकर यांची निवड झाली.


पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर प्राचार्य कुंभार, ॲड. कापसे

## पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती



आर. आर. कुंभार



अभिजित कापसे



पृथ्वीराज पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे यांची निवड करण्यात आली. याशिवाय ९ जणांची विविध अधिकार मंडळावर निवड झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज संजय पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली

इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. डॉ. भानारकर यांची निवड झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयोलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) यांची निवड झाली.

तरूण भारत

# विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर १५ जणांची नियुक्ती

- अधिसभा सदस्यपदी डॉ. आर. आर. कुंभार, ॲड अभिजित कापसे, स्थायी समितीवर पृथ्वीराज पाटील


आर. आर. कुंभार


अभिजित कापसे


पृथ्वीराज पाटील

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यपदी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजीत कापसे यांची निवड करण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली. याशिवाय आठजणांची विविध अधिकार मंडळावर निवड केली आहे.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक झाली. बैठकीत अधिसभा सदस्य म्हणून दोन व अन्य अधिकार मंडळावर तेरा जणांची निवड केली आहे. दरम्यान, या सदस्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. १३ पैकी ११ जणांची नियुक्ती केल्यासंदर्भातील माहिती संबंधितांना ई–मेलद्वारे पाठविली आहे. नियुक्त सदस्यांना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या स्वाक्षरीने पत्रे पाठवली. प्राचार्य प्रतिनिधी गटातून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुंभार व संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती झाली. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी डॉ. एम. के. भानारकर यांची निवड झाली. कम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज हातकणंगले); भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. आर. पी. पाटील (म.ह.शिंदे कॉलेज तिसंगी), मायक्रोबॉयलॉजी अभ्यास मंडळावर डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) यांची निवड करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

21 JUL 2025

वामाक्षी
Mob.- 9175089609

# कितीही स्थित्यंतरे आली तरी चित्रपटाचे 'स्टोरीटेलिंग' कायमच : डॉ. जब्बार पटेल

कोल्हापूर, : (महान्यूज अँड व्ह्यूज ):

चित्रपट ही अत्यंत सर्जनशील बाब आहे. या क्षेत्रात आज तंत्रज्ञानात्मक बदल गतीने होत आहेत. ही स्थित्यंतरे होत राहणार, आव्हाने बदलणार; मात्र गोष्ट सांगणे हा त्याचा मूळ गाभा मात्र कायम राहणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात बी.ए. (फिल्म मेकिंग) च्या विद्यार्थ्यांसह संगीत व नाट्यशास्त्र तसेच अन्य विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि रसिक नागरिकांसमवेत आज डॉ. जब्बार पटेल यांच्या मुक्तसंवादाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात डॉ. पटेल यांनी उपस्थितांना त्यांच्या अभ्यासू आणि अनुभवी वाणीने खिळवून ठेवले. त्यांचा हा मुक्तसंवाद सुमारे दोन तासांहून अधिक काळ रंगला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पटेल म्हणाले, आज चित्रपटसृष्टीसमोर तंत्रज्ञानासह मोबाईल, ओटीटी अशी अनेक आव्हाने उभी आहेत. हे होतच राहणार. मात्र, चित्रपटाच्या क्षेत्रात स्टोरीटेलिंगला सर्वाधिक महत्त्व आहे. या माध्यमाद्वारे चांगली गोष्ट सांगितली गेल्यास ती आवर्जून पाहणारे प्रेक्षकही लाभतात. हे स्टोरीटेलिंग एक तर साहित्यातून येते अगर अनुभवातून येते. त्यासाठी सकस वाचन आणि सातत्यपूर्ण काम करीत राहणे आवश्यक आहे.



त्याखालोखाल दिग्दर्शकाचे महत्त्व असते. तो गोष्ट कशी मांडतो, हेही महत्त्वाचे ठरते. आजघडीला ग्रामीण कलाकारांच्या हाती साधने आल्यामुळे ते त्यांच्या गोष्टी सांगताहेत. त्यापासून बहुसंख्य शहरी वर्ग अनभिज्ञ आहे. त्यामुळे शहरी कलाकारांची या क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टात येते आहे. सिनेमाच्या फ्रेममध्ये जीवन बदलून टाकण्याची ताकद आहे. ती फ्रेम पूर्णांशाने समजून घेणे खूपच महत्त्वाचे आहे.

मला औपचारिक शिक्षण मिळाले नाही. त्यामुळे ते नव्या पिढीला मिळावे ही तळमळ माझ्या मनी असते. अशा शिकलेल्या मुलांकडून माझ्या अपेक्षाही मोठ्या आहेत. तथापि, शिक्षणामुळे अहंकार न येता नवे ज्ञान मिळविण्याची आस बाळगून त्यांनी या क्षेत्रात काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाने जगभरातील अभिजात चित्रपटांचे संकलन करून ते विद्यार्थ्यांना पाहण्यास उपलब्ध करावेत, त्याचप्रमाणे चित्रपटविषयक ग्रंथांचा संग्रहही निर्माण करावा, असे आवाहन पटेल यांनी केले.

## 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे

भारतीय चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत आणि विकासात कोल्हापूरच्या कलाकारांचे महान योगदान आहे. त्यांच्या शैलीने काम करणाऱ्या येथील कलाकारांना 'कोल्हापूर स्कूल' म्हणून ओळखले जाते. इथली कार्यशैली, मापदंड, तंत्रज्ञान चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे आणि येथील कलाकारांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवावा. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमामुळे कोल्हापूर स्कूलला निश्चितपणे ऊर्जितावस्था प्राप्त होईल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, चित्रपटसृष्टीत चांगली कारकीर्द घडवू पाहणाऱ्या क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट व्हावा, यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व साधनसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. डॉ. पटेल यांच्या सूचनेनुसार ग्रंथ आणि चित्रपट यांचे संकलनही करण्यात येईल. याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, प्रवीण पांढरे यांनी परिचय करून दिला तर साक्षी वायमोडे यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रशियन भाषेचे चार विद्यार्थी शैक्षणिक भेटीसाठी मॉस्को येथील रशियन पीपल्स फ्रेन्डशिप युनिव्हर्सिटी येथे दाखल झाले आहेत. त्यात राधा जाधव, प्रेरणा नलावडे, सारा नायकवडी, मयूर दादवणे यांचा समावेश आहे.

# रशियन शिकता शिकता गाठले 'मॉस्को'

## विद्यापीठातील विदेशी भाषेच्या विद्यार्थ्यांना संधी

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेच्या चार विद्यार्थ्यांना थेट रशियाला शैक्षणिक भेट देण्याची संधी लाभली आहे. मॉस्को येथील रशियन पीपल्स फ्रेन्डशिप युनिव्हर्सिटी येथे आयोजित समर स्कूलसाठी विभागातील राधा जाधव, प्रेरणा नलावडे, सारा नायकवडी आणि मयूर दादरणे हे रशियन भाषा आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी रशियात दाखल झाले आहेत.

विदेशी भाषा विभागाने गेल्या काही वर्षांत रशियन भाषा अध्यापनात विशेष प्रगती साधली आहे. परिणामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि रशियन पीपल्स फ्रेन्डशिप युनिव्हर्सिटी या संस्थांच्या शैक्षणिक सहकार्याने रशियातील समर स्कूलमध्ये सहभागी होण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली. १४ जुलै ते २८ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना रशियन भाषेच्या प्रशिक्षणासह तेथील आधुनिक जीवनशैली, साहित्य आणि समाजव्यवस्था यांचाही अनुभव घेता येणार आहे. अभ्यासक्रमाचा संपूर्ण खर्च आयोजक संस्थेने उचलला असून विद्यार्थ्यांना निवास आणि शैक्षणिक सुविधा मोफत मिळणार आहेत. 'रशियन भाषेच्या माध्यमातून आम्हाला रशिया प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली आहे. हा अनुभव रोमांचक आहे. आम्ही मॉस्कोतील सर्व प्रमुख ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना देखील भेटी देणार असल्याचे राधा जाधव हिने सांगितले.

**परदेशी भाषेतील अभिव्यक्तीचा आत्मविश्वास**

या उपक्रमाविषयी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी सांगितले की, 'हे यश आमच्यासह विद्यापीठासाठी अभिमानास्पद आहे. अशा संधी विद्यार्थ्यांचे जागतिक व्यक्तिमत्त्व घडवतात आणि परदेशी भाषेतील अभिव्यक्तीचा आत्मविश्वासही देतात.'